SJIF 2014 = 3.189
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# संवाद कौशल्य विकासासाठी तयार केलेल्या उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

संशोधिका
सौ. मेघना देव

असो. प्रोफेसर
डॉ. चंदन शिंगटे

**Abstract**

***सदर संशोधन विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीतून संवाद कौशल्य विकसनासाठी उपक्रम राबविला असता काय परिणाम दिसून येतो हे पाहण्यासाठी केलेले आहे. यामध्ये एका उपक्रमाद्वारे पाच कृती कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत. इंग्रजी भाषेतील शब्दांचे, वाक्यांचे, उच्चारांचे वारंवार श्रवण, अर्थपूर्ण वाचन व वापर करून संभाषण करण्यावर भर दिलेला आहे. उपक्रम राबविल्यानंतर त्याचे गट करून त्यांना ठराविक विषय संभाषणासाठी देवून पद्‌निश्चयन् श्रेणीद्वारे त्यांचे मूल्यांकन करण्यात आले. या अभ्यासाअंती असे आढळून आले की,***

***उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या कानावर इंग्रजी शब्द व त्यांचे उच्चार वारंवार पडल्याने त्यांना इंग्रजी भाषा अवगत होण्यास मदत झाली.***

***सोपी व छोटी वाक्ये तयार करून विद्यार्थी एकमेकांशी संवाद करू लागले.***

***संशोधनात राबविलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य या जीवनकौशल्याचा विकास करता आला.***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

सध्याचे युग हे संगणकाचे आणि स्पर्धेचे युग आहे. आधुनिक जगात यशस्वीरीतीने जगण्यासाठी पुढील दहा जीवनकौशल्ये शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांत विकसित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जी जीवनकौशल्ये पुढीलप्रमाणे आहेत. १) स्व ची जाणीव शिक्षणाद्वारे स्वत:ची ओळख स्वत:ला झाली पाहिजे.

२) समानानुभुती- शिक्षणातून भावनिक एकात्मता साधता आली की समानानुभुतीचा प्रत्यय येतो.

**३) सारासार विचार- जगात वावरताना योग्य काय? अयोग्य काय? हे समजण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे. ४) सृजनात्मकता- सर्जनशीलता म्हणजे नविन कल्पनांची संबंधांची निर्मिती करण्याची कृती होय.**

**५) समस्यानिराकरणक्षमता- एखादी समस्या समोर उभी ठाकली तर योग्य ते उपाय योजून ती दूर करणे.**

**६) निर्णय कौशल्य- योग्य वेळी योग्य निर्णय घेता येणे. ७) संवाद कौशल्य- समोरील व्यक्तीशी प्रसंगानुरूप, योग्य प्रतिक्रिया व्यक्त करून बोलता आले पाहिजे. ८) आंतरव्यक्ती संबंध-व्यक्ती-व्यक्तींमध्ये योग्य प्रकारे वागून संबंधामध्ये समतोल साधता येणे. ९) तणाव नियोजन- आयुष्यात निर्माण होणाऱ्या ताणांवर मात करून, योग्य मार्गक्रमण करता येणे. १०) भावनिक समायोजन- आपल्या व इतरांच्या भावना ओळखून त्यानुरुप वागणे.**

**सध्याच्या आधुनिक युगात एकाच घटकांचे उत्पादन वेगवेगळ्या कंपन्या करत असतात आणि आपला माल खपला जावा म्हणून विक्रेते नेमत असतात, जाहिराती करत असतात. सध्या विक्रयकला (चरीज्ञर्शीींळपस) हा देखील एक शैक्षणिक अभ्यासक्रम घेतला जातो. यामध्ये उत्तमरीतीने संवाद साधता येणे गरजेचे असते. म्हणजेच संवादकौशल्य हे जीवनकौशल्य आत्मसात करता आले तर जगणे सुखकर होते. तसेच सर्व प्रकारचे उच्च शिक्षण इंग्रजी माध्यमातून असल्याने इंग्रजी भाषा अवगत होणे, इंग्रजीतून संवाद साधणे सर्वत्र जरूरीचे झाले आहे.**

**गरज**

**१) आजच्या युगात प्रगत शिक्षणासाठी इंग्रजी भाषा अवगत असणे खूप गरजेचे आहे. त्यामुळे**

**इंग्रजी भाषेतून संवाद साधता येणे हे अगदी आवश्यक होऊन बसले आहे.**

**२) शाळा ही बालकाच्या सामाजिकीकरणाची पहिली पायरी असते. शाळेत वेगवेगळ्या व्यक्तींशी संवाद योग्य प्रकारे साधता आला पाहिजे.**

**महत्त्व**

**विद्यार्थी :- इंग्रजी भाषेतून संवाद साधता आल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.**

**शिक्षक- इंग्रजी विषयाचे अध्यापन सुलभ होते.**

**समस्या विधान- विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीतून संवाद कौशल्य विकसनासाठी तयार केलेल्या उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.**

**कार्यात्मक व्याख्या**

**१) विद्यार्थी:- माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाचा अभ्यास करणारे इयत्ता ८ वीतील मुले/मुली.**

**२) इंग्रजी: शालेय अभ्यासक्रमातील एक विषय.**

**३) संवाद कौशल्य– देहबोली व इंग्रजी संभाषणाच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त करण्याची क्रिया.**

**४) विकासः– इंग्रजीतून व्यवस्थित संवाद साधता येणे.**

**५) उपक्रमः– विशिष्ट उद्दिष्ट प्राप्तीसाठी केलेला कृती कार्यक्रम.**

**६) परिणामकारकताः– संवाद कौशल्यामध्ये झालेली वाढ.**

**उद्दिष्टे**

**१) विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य साधण्याच्या मार्गातील अडचणी जाणून घेणे.**

**२) विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्याचा विकास होण्यासाठी उपक्रम तयार करणे**

**३) विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या कृती कार्यक्रमाद्वारे उपक्रम राबविणे.**

**४) विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीतून संवाद कौशल्याचा विकास होण्यासाठी राबविलेल्या उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.**

**गृहितके**

**१) विद्यार्थ्यांना इंग्रजीतून संवाद साधताना भीती वाटते.**

**२) विद्यार्थी आत्मविश्वासपूर्वक संवाद साधू शकत नाहीत.**

**परिकल्पना**

**विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीतून संवाद कौशल्याचा विकास करण्यासाठी उपक्रम राबविल्यास सार्थ परिणाम दिसून येतो.**

**शून्य परिकल्पना**

**विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीतून संवाद कौशल्याचा विकास करण्यासाठी उपक्रम राबविल्यास सार्थ परिणाम दिसून येत नाही.**

**व्याप्ती**

**प्रस्तुत संशोधन पुणे शहरातील मराठी माध्यमाच्या शाळेत इयत्ता ८ वीत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.**

**मर्यादा**

**प्रस्तुत संशोधन उपलब्ध प्रतिसादकांच्या प्रतिसादावर अवलंबून आहे.**

**परिमर्यादा**

**१) सदर संशोधन इंग्रजीतून संवाद कौशल्याचा विकास करण्यापुरते मर्यादित आहे.**

**२) सदर संशोधन सेवासदन संस्थेतील श्रीमती रमाबाई रानडे प्रशालेतील इयत्ता ८ वील विद्यार्थ्यांपुरते मर्यादीत आहे.**

**संशोधन पद्धती– प्रायोगिक पद्धती संख्याशास्त्रीय तंत्र– 'टी' परीक्षीका**

**माहिती मिळविण्याची साधने – संपादन चाचणी**

**जनसंख्या– पुणे शहरातील मराठी माध्यमाच्या शाळेत शिकणारे सर्व विद्यार्थी.**

**न्यादर्श– सेवासदन संस्थेतील श्रीमती रमाबाई रानडे हायस्कूल मध्ये इयत्ता ८ वीतील ३० विद्यार्थी. संशोधनाची कार्यपद्धती**

**विद्यार्थ्यांमध्ये या संशोधनांतर्गत घेतलेल्या उपक्रमात पुढील कृती कार्यक्रम राबविले.**

**कृती (१) वर्गातील अध्यापनात इंग्रजीचा जास्तीत जास्त वापर केला.**

**कृती (२) विद्यार्थ्यांना इंग्रजी ध्वनिफिती ऐकवल्या.**

**कृती (३) रोज इंग्रजी डिक्शनरीतून १० नविन शब्द शोधून त्यांचा वाक्यात उपयोग करणे.**

**कृती (४) रोज इंग्रजी वर्तमानपत्राचे वाचन करणे.**

**कृती (५) विद्यार्थ्यांना आपआपसात इंग्रजीतून संभाषण करण्यास प्रवृत्त केले.**

**वरील कृती कार्यक्रम एक महिनाभर राबविल्यानंतर प्रत्येकी ५ विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना वेगवेगळे विषय देवून संभाषण चाचणी घेतली आणि पुढील गुणविशेषांना योग्य ती श्रेणी देवून संभाषण चाचणी घेतली आणि पुढील गुणविशेषांना योग्य ती श्रेणी देवून त्यानुसार एकूण गुण नोंदविले.**

**गुणविशेषः १) इंग्रजी शब्दोच्चार, २) आत्मविश्वास, ३) योग्य वाक्यनिर्मिती ४) सुसंगतपणा/सहकार्य, ५) संभाषण कौशल्य.**

**पदनिश्चयन् श्रेणी**

| श्रेणी– | उत्कृष्ट | चांगला | सामान्य | बरा | वाईट | |
|---|---|---|---|---|---|---|
| गुण – | ४ | ३ | २ | १ | ० | |
| माहिती विश्लेषण | | | | | | |
| | | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | | व.ष.=२९ करीता ीं | |
| माध्यमान | | ५.६७ | १३. ५३ | | ०.०५ | स्तर= २.०४ |
| प्रमाण विचलन | | २.४६ | २.३४ | | ०.०१ | स्तर = २.७६ |
| प्राप्त किंमती | | ी = ०.८६ | ीं =६.१९ | | | |

**अर्थ निर्वचन – प्राप्त ीं चे मुल्य हे ०.०५ स्तरावरील ीं च्या मुल्यापेक्षा तसेच ०.०१ स्तरावरील ीं च्या मूल्यापेक्षा जास्त आहे त्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल.**

**निष्कर्ष– १) विद्यार्थ्यांना इंग्रजी शब्द व त्यांचे उच्चार माहित नसल्याने ते इंग्रजीतून संवाद साधू शकत नव्हते. २) परकीय भाषा असल्याने इंग्रजीतून आत्मविश्वासपूर्वक संवाद साधता येत नव्हता. ३) उपक्रमातून राबविलेल्या कृती कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या कानावर वारंवार इंग्रजी शब्द व त्यांचे उच्चार**

**पडल्याने त्यांना इंग्रजी भाषा अवगत होण्यास मदत झाली. ४) सोपी व छोटी इंग्रजी वाक्ये तयार करून विद्यार्थी एकमेकांशी आत्मविश्वासाने इंग्रजीतून संवाद साधू लागले.**

**शैक्षणिक योगदानः- इ. ८ वी पासून गणित, शास्त्र हे विषय सेमी इंग्रजी माध्यमातून शिकविले जात असल्याने इंग्रजी विषयाचे शिक्षण तिथे उपयोगी पडते. इंग्रजीतून प्रश्नाची उत्तरे सांगणे सुलभ झाले.**

**संदर्भ :-१) जुषीव ऊळलींळेपरीू, २) डरज्ञरश्र ढळाशी-छ्शुी झरशिी ३) ढळाशी`ष खपवळर ४) उ.ऊफ्नि षीा डशरीप छशुीं ५) त्र्रीप ुळींह चींश्रींळश्रिळलरींळेप ६) अपळारींशव तळवशे उ.ऊी ७) चींळशी श्रळज्ञश , केश रश्रेपश, करीीू झ्रींशी, केमशू ख डर्हींपज्ञ िंहश ज्ञळवफ्नि ८) डशिरज्ञुशश्रश्र एपसश्रळीह- ऊऋ झरीरपसशि ९) इंग्रजी पाठ्य पुस्तक (इयत्ता ८ वी) १०) शैक्षणिक संशोधन- मुळे, उमाठे**